क्रमांक : मुमप्रविप्रा/बैठक/४६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

दिनांक : १४ डिसेंबर, १९८७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३० नोव्हेंबर, १९८७ रोजी झालेल्या ४६व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्री. वि. आसगांवकर
(श्र.वि.आसगांवकर)
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य.

No.BMRDA/MTG/46

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th Floor, Bandra(East),
BOMBAY - 400 051.

Date : 14th December, 198

The minutes of the 46th Meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 30th November, 1987 are enclosed.

2. Members are requested kindly to intimate their objections, if any.

(S.V. ASGAONKAR) 14/12
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE

To :

All Members.

ROPOLITAN REGI
T AUTHORITY,
an Bhavan,
Bandra(East),
00 051.

December, 198

he Bombay

d on the

nate

(AONKAR) (4/12
TARY
COMMITTEE



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
४८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

---

दिनांक : ३० नोव्हेंबर, १९८७ (सोमवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता

स्थळ : समिती कक्ष, ५वा मजला, मंत्रालय

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रमण्यन्<br>नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | – | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णु सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री | – | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरिया<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि. पटेल<br>नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्या |
| श्री. भगवंतराव अ. पाटील<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. रमेश दुबे<br>विधानसभा सदस्य. | – | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू,<br>विधानसभा सदस्य | – | सदस्य |
| श्री. स. शं. तिनईकर.<br>महानगरपालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. दिनेशकुमार जैन<br>शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | – | सदस्य |
| श्री. दिनेश अफ्जुलपूरकर<br>शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग. | – | सदस्य |
| श्री. के. नलिनाक्षन<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई | – | सदस्य |
| श्री. एस. आर. काकोडकर<br>महानगर आयुक्त | – | सदस्य-सचिव |

बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या मागील बैठकीचे (४५व्या) कार्यवृत्त पक्के करणे

चर्चेनंतर, वरील बैठकीचे कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या मागील बैठकीच्या (४५व्या) कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

प्राधिकरणाने कार्यवाही प्रतिवेदनाची नोंद घेतली.

बाब क्र.३ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ अन्वये अधिसूचना काढणे - बेट शहर मर्यादांमध्ये पंचतारांकित व चतुः-तारांकित हॉटेलांना जादा चटई क्षेत्र निर्देशांक देण्यासंबंधीची प्रकरणे

राज्य शासनाने पंचतारांकित व चतुःतारांकित हॉटेलांना जादा चटई क्षेत्र निर्देशांक देण्यासंबंधीची प्रकरणे मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ खालील अधिसूचनेच्या कक्षेमधून वगळण्यात येऊ नयेत या कार्यकारी समितीच्या सुधारित शिफारशीवर प्राधिकरणाने सविस्तर चर्चा केली व त्याला मान्यता दिली व खालील ठराव संमत केला :

ठराव क्र.३५३ :

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्या-प्रमाणे कार्यकारी समितीने दि.२४ सप्टेंबर, १९८७ रोजी झालेल्या आपल्या ११२व्या बैठकीमध्ये केलेल्या सुधारित शिफारशींना प्राधिकरण मान्यता देत आहे आणि मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ च्या पोटकलम (१) अनुसार दिलेल्या शक्तींचा वापर करून आणि प्राधिकरण ठराव क्र.३४७, दि.४ सप्टेंबर, १९८७ अन्वये दिलेल्या आदेशामध्ये अंशतः फेरबदल करून प्राधिकरण अशी कार्योत्तर मंजूरी देत आहे की, मुंबई बेट शहरातील पंचतारांकित व चतुःतारांकित विलासी हॉटेलांना बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमांच्या नियम १०(२) अन्वये राज्य शासनाने जादा चटई क्षेत्र निर्देशांक देण्यासंबंधीची प्रकरणे कलम १३ खालील अधिसूचनेच्या कक्षेतून वगळण्यात येऊ नयेत आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे बाब टिप्पणीला असलेल्या जोडपत्र-१ प्रमाणे सदर अधिसूचना प्रकाशित करण्यात यावी.

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की, अत्यंत निकडीमुळे प्राधिकरणाची मान्यता मिळेल या अपेक्षेने अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी या बाबतीत केलेल्या कार्यवाहीचे याव्दारे अनुसमर्थन करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.४ :</u> वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ए' ब्लॉकमधील प्रसूतिगृह व दवाखाना यासाठी ठेवलेल्या भूखंडाच्या आरक्षणामध्ये फेरबदल--जादा क्षेत्रामधून निवासी भूखंड काढणे -- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाची विनंती

टिप्पणीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावाला प्राधिकरणाने मान्यता दिली आणि खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३५४ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की.महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम.१९६६ च्या कलम ११३(८) मध्ये दिलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण याव्दारे वांद्रे-कुर्ला समूहाच्या मंजूर नियोजन प्रस्तावांमध्ये किरकोळ फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.जेणेकरून 'ए' ब्लॉकमधील प्रसूतिगृह व दवाखाना यासाठी राखून ठेवलेल्या चौकोनी भूखंडाचा आकार बदलून तो 'एल' टाईप करण्यात यावा व मंजूर नियोजन प्रस्तावाप्रमाणे रुग्णालयासाठी असलेले ८८०० चौ.मी.आणि प्रसूतिगृह व दवाखाना यासाठी असलेले 3000चौ.मी.क्षेत्र तसेच कायम ठेवावे आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने आपल्या दि.८ जुलै.१९८७ च्या पत्रामध्ये विनंती केल्याप्रमाणे मिळालेले जादा क्षेत्र (६७९.५० चौ.मी.) निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात यावे.

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की.उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याव्दारे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि कमीतकमी दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये नोटीस प्रकाशित करण्यास आणि अशा नोटीशीपासून एक महिन्याच्या आत अशा फेरबदलांच्या बाबतीत जनतेकडून आक्षेप आणि सूचना मागविण्यास मान्यता देत आहे.

"यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की.उक्त अधिनियमाच्या कलम १३९ अन्वये तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम.१९७४ च्या कलम ७-अ अन्वये दिलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण याव्दारे.महानगर आयुक्त यांना वरील खंडानुसार नोटीस प्रसिध्द करण्यास प्राधिकृत करीत आहे.

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की.उक्त अधिनियमाच्या कलम १५१(३) अन्वये मिळालेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण असा निदेश देत आहे की.महानगर आयुक्तांनी.असे आक्षेप/सूचना सादर करणाऱ्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर याबाबतीत आलेले आक्षेप/सूचना यावर विचार करावा आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या संदर्भात अंतिम मंजुरीसाठी प्रस्तावित फेरबदलासह आपला अहवाल राज्य शासनाला सादर करावा."

बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' ब्लॉकमधील वाणिज्यिक भूखंड क्र.सी-१९ ची विक्री

दिनांक २७ एप्रिल १९८७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ४४व्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार वाणिज्यिक भूखंड क्र.सी-१९ हा दि.20 मे १९८७ रोजी पाठविलेल्या देकाराच्या औपचारिक पत्रान्वये महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाला देण्यात आला होता याची प्राधिकरणाने नोंद घेतली. तथापि, महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ, आपल्या आर्थिक अडचणींमुळे देकाराच्या पत्रामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अधिमूल्याची रक्कम देऊ शकले नाही. अधिमूल्याची रक्कम १0 हप्त्यांमध्ये देण्यास परवानगी देण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाने अध्यक्ष,मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना विनंती केली होती याचीही नोंद घेण्यात आली. महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळासमोर असलेल्या समस्या आणि अडचणी यांचा विचार करून प्राधिकरणाने एक विशेष बाब म्हणून असे ठरविले की, महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ हा महत्वाची उपयोगिता सेवा देणारा राज्य शासनाचा उपक्रम असल्याचे विशेषेकरुन लक्षात घेता मंडळाला दिलेला देकार पुन्हा विधिग्राहय करण्यात यावा आणि त्यांनी देय असलेले अधिमूल्य, तसेच त्यावरील विलंबापोटी द्यावे लागणाऱ्या व्याजासहीत (दरवर्षी १५% व्याजाने) खालीलप्रमाणे देण्यास परवानगी देण्यात यावी.

(१) ३१ डिसेंबर १९८७ रोजी किंवा तत्पूर्वी १ कोटी रुपयांची रक्कम देण्यात यावी आणि

(२) अधिमूल्याची राहिलेली रक्कम त्यावर देय होणाऱ्या व्याजासह पाँच समान मासिक हप्त्यांमध्ये देण्यात यावी.

त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला :

ठराव क्र.३५५ :

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की, दि.२७ एप्रिल, १९८७ रोजी झालेल्या ४४व्या बैठकीमध्ये संमत केलेल्या प्राधिकरणाच्या ठराव क्र.३४८ अनुसार मंजूर केल्याप्रमाणे वांद्रे कुर्ला समूहाच्या 'ई' ब्लॉकमधील ५०६० चौ.मी. अनुज्ञेय परिबध्द क्षेत्र असलेला भूखंड क्र.सी-१९ हा प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मीटरला ६५०० रु.(सहा हजार पांचशे रु.फक्त) या अधिमूल्याने महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला देण्यासंबंधीचा देकार याव्दारे खालील अटीवर पुन्हा विधिग्राहय करण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ दि.३१ डिसेंबर १९८७ रोजी किंवा तत्पूर्वी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाला १ कोटी रु.ची रक्कम देईल, आणि

(२) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिमूल्याची राहिलेली रक्कम त्यावर देय होणाऱ्या व्याजासह पांच समान मासिक हप्त्यांमध्ये देईल.

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना यान्दारे या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी पुढील योग्य कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.६ : वडाळा-अनिक क्षेत्रातील ६.५ हेक्टर क्षेत्रफळाची जमिन घरबांधणीसाठी माथाडी कामगार युनियनला हस्तांतरित करणे

या बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ज्या अटींवर माथाडी कामगार युनियनला जमीन हस्तांतरित करण्याचे योजिले आहे त्या अटींची आणि शर्तींची तपशीलवार माहिती आणि माथाडी कामगार युनियन ती जमीन कशा प्रकारे उपयोगात आणणार आहे यासंबंधीची माहिती प्राधिकरणासमोर विचारार्थ ठेवण्यात यावी अशी काही सदस्यांनी इच्छा व्यक्त केली. या बाबीवरील विचारविनिमय पुढे ढकलण्यात आला आणि खालील तपशिलासह सदर प्रस्ताव पुन्हा प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावा अशी महानगर आयुक्तांना विनंती करण्यात आली (१) प्रस्तावित ट्रक टर्मिनलमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांच्या घरबांधणीसाठी जर जमीन हस्तांतरित केली गेली तर महाराष्ट्र राज्य माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार युनियन ती जमीन कशाप्रकारे वापरणार आहेत. (२) गाळे वाटपासाठी माथाडी कामगार युनियन कोणती कार्यपध्दती अनुसरणार आहे आणि (३) माथाडी कामगार युनियनला हस्तांतरित करावयाच्या जमिनीसाठी ठरविलेल्या तपशीलवार अटी व शर्ती इत्यादी.

बाब क्र.७ : सचिव, कार्यकारी समिती या पदाची श्रेणीवाढ करणे

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचार केला आणि विशेषतः पदाचे अत्यंत महत्वाचे स्वरुप लक्षात घेऊन सचिव, कार्यकारी समिती या पदाची राज्य शासनाच्या अवर सचिवाच्या दर्जावरून उप सचिवाच्या दर्जापर्यन्त श्रेणीवाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव संमत केला :

ठराव क्र.३५६ :

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की, प्राधिकरण यान्दारे १ डिसेंबर, १९८७ पासून सचिव, कार्यकारी समिती या पदाची राज्य शासनाच्या उप सचिवाच्या दर्जापर्यन्त श्रेणीवाढ करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देत आहे."

..६/-

<u>बाब क्र.८ :</u> मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम १९८३ च्या कलम ८ चे उपकलम (१) अन्वये कळंबोली जि.रायगड येथील लोखंड व पोलाद घाऊक बाजारपेठेच्या बाजार समितीला नाव देणे

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३५७ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की,मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठा (स्थान नियमन) अधिनियमाच्या कलम ८,पोटकलम (१) अन्वये प्रत्यायोजित केलेल्या शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण याव्दारे,मु.म.प्र.वि.प्राधिकरण अधिसूचना क्र.टीसीपी/पीओ(एम)/आय ॲन्ड एस/५४७,दि.२२.०९.१९८६ च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये वर्णिलेल्या बाजारपेठेत काम करणाऱ्या बाजार समितीस (शासन अधिसूचना क्र.बीएमआरडीए/४८४/१२२८/सीआर-१२८/८४ युडी-४ दि.२३ जानेवारी, १९८७ प्रमाणे स्थापन झालेली आणि महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-एक कोकण विभाग पुरवणी,दि.१२.२.१९८७ च्या पृष्ठ क्र.१६१ वर प्रसिध्द झालेली)"मुंबई महानगर प्रदेश,लोखंड व पोलाद बाजार समिती,कळंबोली"असे नाव देत आहे आणि तदनुसार हे नाव सर्व संबंधित संस्थाना व शासनाला कळविण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.९ :</u> मु.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना १९८६-८७ या वर्षाकरिता सानुग्रह अनुदान (ex-gratia payment) मंजूर करण्याबाबत..

प्राधिकरणाने या बाबीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३५८ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की,मु.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे राज्य शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना मंजूर केलेल्या बोनसच्या धर्तीवर १९८६-८७ या वर्षासाठी मु.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याच्या प्रस्तावास मंजूरी देत आहे.

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की,अध्यक्ष,मु.म.प्र.वि. प्राधिकरण यांनी कर्मचाऱ्यांना १९८६-८७ या वर्षासाठी सानुग्रह अनुदान देण्याविषयी केलेल्या कार्यवाहीचे याव्दारे अनुसमर्थन करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.१० :</u> बीबीआर/बॅकबे रिक्लमेशनच्या ३.ते ६ क्रमांकाच्या ब्लॉकमधील क्षेत्राकरिता प्रारुप विकास आराखडा आणि श्री.चंद्रशेखर प्रभू यांचे त्यावरील अभिप्राय

या बाबीवरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

<u>बाब क्र.११ :</u> <u>प्राधिकरणाचे १९८६-८७ सालचे वार्षिक लेखे</u>

प्राधिकरणाने या टिप्पणीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३५९ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की.मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९८६-८७ सालाच्या लेख्यांना व त्यावरील वित्त सल्लागाराच्या अहवालास प्राधिकरण आपली मान्यता देत आहे."

<u>बाब क्र.१२ :</u> <u>प्राधिकरणाच्या १९८६-८७ सालचा वार्षिक अहवाल</u>

प्राधिकरणाने या बाबीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३६० :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की.प्राधिकरण याव्दारे १९८६-८७ या वर्षाच्या मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालाच्या मसुद्याला मान्यता देत आहे आणि तो राज्य शासनाला सादर करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१३ :</u> <u>मुंबई नागरी विकास प्रकल्पाचा १९८६-८७ चा वार्षिक प्रगती अहवाल</u>

मुंबई नागरी विकास प्रकल्पाच्या १९८६-८७ या वर्षाच्या वार्षिक अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

<u>बाब क्र.१४ :</u> वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राचा १९८६-८७ या वर्षाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने सादर करावयाचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने या बाबीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३६१ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की.वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे तयार करण्यात आलेल्या

..८/-

१९८६-८७ सालाच्या प्रारुप अहवालास प्राधिकरण याव्दारे मंजूरी देत आहे आणि तो अहवाल राज्य शासनास सादर करण्याकरिता महानगर आयुक्तास याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१५ :</u> कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राचा १९८६-८७ या वर्षाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने सादर करावयाचा वार्षिक अहवाल..

प्राधिकरणाने या बाबीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३६२ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की,कल्याण अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे तयार करण्यात आलेल्या १९८६-८७ सालाच्या प्रारुप अहवालास प्राधिकरण याव्दारे मंजूरी देत आहे आणि तो अहवाल राज्य शासनास सादर करण्याकरिता महानगर आयुक्तास याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१६ :</u> ओशिवरा जिल्हा केंद्राचा १९८६-८७ या वर्षाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने सादर करावयाचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने या बाबीवर चर्चा केल्यानंतर खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३६३ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की,ओशिवरा अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे तयार करण्यात आलेल्या १९८६-८७ सालाच्या प्रारुप अहवालास प्राधिकरण याव्दारे मंजूरी देत आहे आणि तो अहवाल राज्य शासनास सादर करण्याकरिता महानगर आयुक्तास याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१७ :</u> १९८६-८७ या वर्षाच्या बॅकबे रिक्लमेशन योजनेच्या ब्लॉक ३ ते ६ मध्ये समाविष्ट असलेल्या अधिसूचित क्षेत्रासाठी एक विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने सादर करावयाचा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने या बाबीवर विचार करुन खालील ठराव संमत केला :

..९/-

<u>ठराव क्र.३६४ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की, बॅकबे रिक्लमेशन योजनेच्या ब्लॉक ३ ते ६ मध्ये समाविष्ट असलेल्या अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले एक विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ खाली आवश्यक असल्याप्रमाणे तयार करण्यात आलेल्या १९८६-८७ सालाच्या प्रारुप अहवालास प्राधिकरण याव्दारे मंजूरी देत आहे आणि, तो अहवाल राज्य शासनास सादर करण्याकरिता महानगर आयुक्तास याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१८ :</u> विकास आराखडा, उल्हासनगर, आरक्षण क्र.१९५ या जागा वापर बदल - दुभत्या जनावरांच्या गोठ्यासाठी आरक्षिलेल्या जागेचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे शहाड पाणी पुरवठा योजना उपयोगासाठी करावयाच्या बदलासंबंधी

---

शहाड पाणी पुरवठा योजनेसाठी जी बरोबरच आवश्यक आहेत अशी बांधकामे संदर्भाधीन जमिनीवर करण्यात यावी असे शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला सांगावे आणि पाणी पुरवठा प्रकल्पाशी संबंधित नसलेली कोणतीही कामे करण्यास परवानगी देऊ नये या अटींच्या अधीन राहून बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली व खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३६५ :</u>

"ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४०(१) (सी) अनुसार दि.१५.०३.१९७६ च्या शासन निर्णयानुसार कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ११३(८) अन्वये नियोजन प्राधिकरण म्हणून काम करणे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाला बंधनकारक आहे; आणि

"ज्याअर्थी, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथच्या पूर्वीच्या नगर परिषदांचे क्षेत्र आणि उल्हासनगरच्या हद्दीमधील क्षेत्र हे उक्त नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारितेमध्ये समाविष्ट झाले आहे, आणि

"ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने म्हारळ येथील आपल्या पाणी पुरवठा योजनेचा विस्तार करण्याचे योजिले आहे आणि त्या प्रयोजनासाठी उल्हासनगर नगर परिषदेच्या हद्दीमध्ये असलेल्या स.नं.४२ आंशिक, २६ आंशिक, ३५ आंशिक, ३६ आंशिक, ३४ आंशिक आणि ४५ आंशिक या ५.२९.९१ हेक्टर क्षेत्रफळाच्या जमिनी त्यांना आवश्यक आहेत, आणि

''ज्याअर्थी, उल्हासनगरच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार सदर जमिन 'दुभत्या जनावरांचे गोठे' यासाठी राखून ठेवलेल्या जागा क्र.१९५ चा एक भाग असून ती जागा उल्हासनगर नगर परिषद तिच्या नामनिर्देशित प्रयोजनासाठी विकसित करणार नाही किंवा विकसित होण्याची शक्यता नाही.

''ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला सदर जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी म्हणजे पाणी पुरवठा योजनेसाठी बरोबर आवश्यक आहे याबाबत मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची खात्री झाली आहे.

"त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमाच्या कलम ११३(८) अनुसार दिलेल्या शक्तींचा वापर करून प्राधिकरण याव्दारे अशी शिफारस करण्याचा ठराव संमत करीत आहे की, 'दुभत्या गुरांचे गोठे' यासाठी राखून ठेवलेल्या जमिनीपैकी शासनाच्या जमिनीचा काही भाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला हस्तांतरित करण्यात यावा आणि विकास योजनेमध्ये 'दुभत्या गुरांचे गोठे' यासाठी केलेल्या नामनिर्देशनाऐवजी ती जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी म्हणजे शहाड पाणी-पुरवठा योजनेसाठी उपयोगात आणण्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने शहाड पाणी पुरवठा योजनेसाठी जी बरोबरच आवश्यक आहेत अशी बांधकामे या जमिनीवर करावीत आणि पाणी पुरवठा प्रकल्पाशी संबंधित नसलेली कोणतीही कामे करण्यास परवानगी देण्यात येणार नाही या अटींच्या अधीन राहून परवानगी द्यावी. राहिलेली जमीन उल्हासनगरच्या सुधारीत विकास योजनेच्या प्रस्तावांना अंतिम स्वरुप मिळेपावेतो दुभत्या गुरांचे गोठे यासाठी राखून ठेवण्यात यावी.

"यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना याव्दारे वरील धर्तीवर शासनाला योग्य रीतीने विनंती करण्यास आणि याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यास प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र.१९ :</u> मुंबई महानगर प्रदेशासाठी प्रादेशिक योजनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण सूचना प्रसिध्द करण्याबाबत.

प्राधिकरणाने या बाबीवर विचार करून खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्र.३६६ :</u>

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १२ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेल्या शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून प्राधिकरण याव्दारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशासाठी

असलेला प्रादेशिक नकाशामध्ये सुधारणा करण्याच्या आणि विद्यमान जमीन वापर सर्वेक्षण, बहुप्रयोजनी कौटुंबिक सर्वेक्षण आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे इतर सर्वेक्षण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (प्रादेशिक नियोजन मंडळ) नियम १९६७ च्या नियम ५, पोटनियम (२) अनुसार अशा सर्वेक्षणाची जाहीर नोटीस दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये म्हणजे (१) टाईम्स ऑफ इंडिया (२) लोकसत्ता यामध्ये प्रकाशित करण्यात यावी

"यापुढे असाही ठराव संमत करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १३७ अनुसार महानगर प्राधिकरणाचा सदस्य-सचिव म्हणून महानगर आयुक्ताच्या सहीने उपरोक्त नोटीस देण्यात यावी आणि प्रकाशित करण्यात यावी"

अध्यक्षाच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय म्हणून खालील बाबीवर विचार करण्यात आला:

<u>पटल बाब</u> : मुंबई शहरामधील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींची पुनर्रचना या कामास गती येण्याच्या उद्देशाने देण्यात यावयाचे अधिक चटई क्षेत्र निर्देशांक

---

या प्रस्तावाच्या काही विशिष्ट बाजूसंबंधी आणि विशेषत: भाडेकरुऐवजी त्याचा फायदा बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना होईल अशी मुलभूत शंका काही सदस्यांनी प्रदर्शित केली म्हणून या प्रस्तावाचे दाटी, विद्यमान भाडेकरु, इत्यादींवर होणारे संभाव्य परिणाम विशद करणारी एक विस्तृत टिप्पणी तयार करुन ती प्राधिकरणाला सादर करावी अशी प्राधिकरणाने इच्छा प्रदर्शित केली. त्यामुळे बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावावरील निर्णय पुढे ढकलण्यात आला.

अध्यक्षाचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

---

MINUTES OF THE FORTY-SIXTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 30th November, 1987 (Monday).

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room, 5th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT:

| | | |
|---|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - | Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - | Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - | Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - | Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - | Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - | Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - | Member |
| Shri S.S. Tinaikar, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - | Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - | Member |
| Shri Dinesh Afzulpurkar, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. | - | Member |
| Shri K. Nalinakshan, Managing Director, C.I.D.C.O., Bombay. | - | Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - | Member-Secretary |

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (45th) Meeting.

After discussion, the minutes were confirmed.

p.t.o..2/-

Item No.2 : Action taken on the minutes of the last (45th) Meeting.

Action taken report was noted.

Item No.3 : Notification under Section 13 of BMRDA Act, 1974 - Cases of grant of extra F.S.I. to Five-Star or Four-Star Hotels in the Island City limits.

The Authority discussed at length the revised recommendation made by the Executive Committee not to exclude cases regarding grant of extra F.S.I. to Five-Star and Four-Star hotels by the State Govt. from the purview of Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974 and approved the same. The following Resolution was then passed :

RESOLUTION NO.353 :

"Resolved that the Authority approves the revised recommendation made by the Executive Committee in its 112th Meeting, held on 24th September, 1987 as brought out in the Item Note and in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 and in partial modification of the orders passed under the Authority's Resolution No.347, dated 4th September, 1987, accords its post-facto sanction for not excluding cases of extra F.S.I. granted by the State Government, under Rule 10(2) of the Development Control Rules for Greater Bombay, to Five-Star and Four-Star Luxury Hotels in the Island City of Bombay, from the purview of Section 13 Notification and for publishing the said Notification as per Annexure-I to the Item Note, as proposed.

"Resolved further that the action taken by the Chairman, BMRDA in this respect in anticipation of the Authority's approval due to urgency, is hereby ratified."

Item No.4 : Modification to reservation of Maternity Home-cum-Dispensary Plot in 'A' Block of Bandra-Kurla Complex - Carving out a residential plot out of excess area - Request of MHADA.

The Authority approved the proposal

..3/-

contained in the Item Note and passed the following Resolution :-

<u>RESOLUTION NO.354</u> :

"Resolved that in exercise of the powers contained in Section 113(8) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, the Authority hereby resolves to initiate minor modification to the sanctioned planning proposals of Bandra-Kurla Complex so as to alter the shape of the plot reserved for Maternity Home-cum-Dispensary in 'A' Block from rectangular to 'L' shape by retaining the areas of 8,600 square metres for Hospital and of 3,000 square metres for Maternity Home-cum-Dispensary intact and to carve out the excess area (679.50 square metres) for residential use as requested by the Maharashtra Housing & Area Development Authority in their letter, dated 8th July, 1987.

"Resolved further that the Authority do hereby, in exercise of powers under Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf, approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in not less than two local newspapers inviting objections and suggestions from the public in respect of such modification not later than one month from the date of such notice.

"Resolved further that the Authority do hereby, in exercise of its powers under Section 139 of the said Act, read with Section 7A of the BMRDA Act, 1974, authorises the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

"Resolved further that the Authority do in exercise of its powers under Section 151(3) of the said Act direct that the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/suggestions and shall submit his report to the State Government alongwith proposed modification for final sanction in terms of Section 37 of the said Act."

Item No.5 : Disposal of Commercial Plot No. C-19 in 'E' Block of Bandra-Kurla Complex.

The Authority noted that as per the decision taken in its 44th Meeting, held on 27th April, 1987 the Commercial Plot No.C-19 was offered to Maharashtra State Electricity Board (MSEB) through a formal letter of offer, dated 20th May, 1987. However, the MSEB could not make payment as specified in the letter of offer on account of their financial difficulties. It was also noted that the MSEB had approached Chairman, BMRDA, to permit them to make payment of the premium in 10 instalments. Considering the problems and difficulties faced by MSEB, the Authority decided that as a special case, particularly in view of the fact that MSEB is a State Government Undertaking providing vital utility service, the offer made to it should be revalidated and it should be allowed to make the payment of the premium due together with interest at the rate of 15% per annum on delayed payment as follows :-

(i) An amount of Rs.1 crore on or before 31st December, 1987; and

(ii) Remaining amount of premium alongwith interest due, to be paid in five equal monthly instalments.

The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.355 :

"Resolved that the offer of Plot No.C-19 containing 5060 square metres permissible built-up area, in 'E' Block of Bandra-Kurla Complex, made to the Maharashtra State Electricity Board (MSEB) at the premium of Rs.6,500/- (Rupees six thousand five hundred only) per FSI square metre, as sanctioned under Authority's Resolution No.346, passed in its 44th Meeting, held on 27th April, 1987,

be and is hereby revalidated on the following conditions :

1) that MSEB shall pay to the BMRDA an amount of Rs.1/crore on or before 31.12.1987; and

2) that MSEB shall pay to the BMRDA the remaining amount of premium along with interest due in five equal monthly instalments.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further suitable action for implementation of this Resolution."

<u>Item No.6</u> : <u>Transfer of land admeasuring 6.5 Ha. in Wadala-Anik Area to the Mathadi-Workers Union for housing.</u>

The item was discussed at considerable length. Some members desired that detailed terms and conditions on which the land is proposed to be transferred to Mathadi Workers Union, and how the Mathadi Workers Union (MWU) is going to utilise it, etc. should be brought before the Authority for its consideration. Further consideration of the item was deferred and the Metropolitan Commissioner was requested to bring up the proposal again before the Authority along with details including (1) how the Maharashtra Rajya Mathadi Transport and General Kamgar Union proposes to utilise the land if transferred to it for housing of Mathadi Workers who will be working in the proposed Truck Terminal; (2) the procedure proposed to be followed by the MWU in allotment of tenements; and (3) detailed terms and conditions of transfer of land to MWU, etc.

<u>Item No.7</u> : <u>Upgradation of the post of Secretary, Executive Committee.</u>

The Authority considered the Item Note and approved the proposal to upgrade the post of Secretary, Executive Committee from the level of Under Secretary in the State Government to the level of Deputy Secretary in the State Government, particularly in view of the crucially important nature of the post. The Authority then passed the

following Resolution :

RESOLUTION NO.356 :

"Resolved that the Authority hereby accords its sanction to the proposal to upgrade the post of Secretary, Executive Committee, to the level of Deputy Secretary in the State Government, with effect from 1st December, 1987."

Item No.8 : Naming the Market Committee of the Wholesale Iron & Steel Market at Kalamboli, Dist. Raigad under Section 8(1) of the Bombay Metropolitan Region Specified Commodities Markets(Regulation of Location) Act, 1983.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.357 :

"Resolved that in exercise of the powers conferred on it by sub-section (1) of Section 8 of the Bombay Metropolitan Region Specified Commodities Markets (Regulation of Location) Act, 1983, the Authority hereby names the Market Committee (constituted by Govt. Notification No.BMRDA/484/1228/CR 128/84 UD-4, dated 23.1.1987 published in Maharashtra Government Gazette Part-I Konkan Division Supplement, dated 12.2.1987 at page 161 for the wholesale market in Iron and Steel), proposed to be started in the market yard described in the second schedule of the BMRDA Notification No.TCP/PO(M)/I&S/547, dated 22.9.1986 as 'the Bombay Metropolitan Region Iron and Steel Market Committee, Kalamboli'; and the Metropolitan Commissioner is hereby authorised to inform all the concerned bodies and Government accordingly."

Item No.9 : Grant of ex-gratia to BMRDA staff for the year 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.358 :

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of

the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby accords sanction to the proposal to make ex-gratia payment to the BMRDA staff for the year 1986-87 on the lines of Bonus sanctioned by the State Government to its employees.

"Resolved further that the action taken by the Chairman, BMRDA for payment of ex-gratia for the year 1986-87 to the staff is hereby ratified."

Item No.10 : Draft Development Plan for area in Blocks III to VI of BBR and comments of Shri Chandrashekhar Prabhu.

Consideration of this Item was deferred.

Item No.11 : Annual Accounts of the BMRDA for the year 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.359 :

"Resolved that the Authority hereby accords its approval to the accounts of the Authority for the year 1986-87 and to the Report of the Financial Adviser thereon."

Item No.12 : Annual Report of the BMRDA for the year 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.360 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report of the BMRDA for 1986-87 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.13 : Bombay Urban Development Project - Annual Report for the year 1986-87.

The Annual Report of Bombay Urban Development Project for the year 1986-87 was noted by the Authority.

p.t.o..8/-

Item No.14 : Annual Report of BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.361 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1986-87 of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Notified Area, as required under Section 133 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.15 : Annual Report of BMRDA as a Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area for the year 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.362 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1986-87 of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area, as required under Section 133 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.16 : Annual Report of BMRDA as a Special Planning Authority for Oshiware District Centre for the year 1986-87.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.363 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1986-87 prepared by BMRDA as the Special Planning Authority

for Oshiware District Centre, as required under Section 133 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, and authorises the Metropolitan Commissioner to forward the same to the State Government."

Item No.17 : Annual Report of BMRDA as a Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme for the year 1986-87.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.364 :

"Resolved that the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1986-87 of the BMRDA as the Special Planning Authority for Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme, as required under Section 133 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.18 : Development Plan of Ulhasnagar Site No.195, change of designation from Milch Cattle Stables to Shahad Water Works by MIDC.

The Authority approved the proposal contained in the Item Note subject to the stipulation that Govt. may ask the MIDC to erect only such structures on the land under reference as are really essential for Shahad Water Works and not to permit any activities which are extraneous to the Water Works Project. The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.365 :

"Whereas BMRDA is appointed as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area by Government under G.R. dated 15.3.1976 under Section 40(1)(c) of the MR&TP Act, 1966, and whereas it is obligatory on BMRDA to perform the functions of Planning Authority under Section 113(8) of the MR&TP Act, 1966; and

"Whereas the area of erstwhile Municipal Councils of Kalyan, Dombivali, Ambernath and the limits of Ulhasnagar are included within the jurisdiction of the said Special Planning Authority; and

"Whereas the MIDC intends to extend its water supply scheme at Mharal and for that purpose lands bearing S.No.42 pt.,

p.t.o..10/-

26 pt., 35 pt., 36 pt., 34 pt., and 45 pt. admeasuring 5.29.91 hectares included within the limits of the Ulhasnagar Municipal Council are required by them; and

"Whereas the aforesaid lands, according to the proposals of the sanctioned Development Plan of Ulhasnagar form part of Site No.195 reserved for 'Milch Cattle Stable', which site is neither developed nor likely to be developed for its designated purpose by the Ulhasnagar Municipal Council; and

"Whereas the BMRDA is satisfied that the aforesaid land is genuinely required by the MIDC for a public purpose viz. water supply scheme;

"Now therefore, in exercise of the powers conferred on it under Section 113(8) of the MR&TP Act, 1966, the Authority hereby resolves to recommend to Government that the portion of Government land in question out of the reservation of 'Milch Cattle Stables' be transferred to the MIDC and be allowed to be utilised for public purposes i.e. Shahad Water Supply Scheme in place of Milch Cattle Stable for which purpose it is designated in the Development Plan, subject to the stipulation that MIDC shall erect only such structures on this land as are really essential for Shahad Water Works and not to permit any activities which are extraneous to the Water Works Project. The remaining land shall continue to be in the reservation for Milch Cattle Stable till the proposals of the Revised Development Plan for Ulhasnagar are finalised.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to suitably request the Government on the above lines and inform all concerned in the matter."

<u>Item No.19</u> : <u>Publication of Notice of Survey for the Revision of Regional Plan for Bombay Metropolitan Region (BMR).</u>

The Authority considered the Item Note

and passed the following Resolution :

RESOLUTION NO.366 :

"Resolved that in exercise of its powers under sub-section (2) of Section 12 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to undertake the revision of the Regional Plan for the Bombay Metropolitan Region as defined in the BMRDA Act, 1974, and undertake existing land-use survey, multi-purpose household survey and other surveys as may be necessary.

"Resolved further that in pursuance of Sub-Rule (2) of Rule 5 of the MRTP (Regional Planning Board) Rules, 1967, a Public Notice of these surveys be published in two local newspapers viz., (1) the Times of India and (2) Loksatta.

"Resolved further that the aforesaid Notice be given and published over the signature of the Metropolitan Commissioner being the Member-Secretary of the Metropolitan Authority pursuant to Section 137 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966."

The following Item was then considered as Table Item with the permission of the Chairman :-

Table Item : Grant of permission with additional F.S.I. for reconstruction of old and dilapidated cessed buildings in Island City of Bombay by landlords.

Some members expressed basic reservations about certain aspects of the proposal, particularly its possible exploitation by builders and developers to the disadvantage of tenants, etc. The Authority desired that a comprehensive note on the subject spelting out the likely implications of the proposal on congestion, existing tenants, etc. should be prepared and brought before the Authority. Decision of the proposal contained in the Item Note was accordingly deferred.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

- - - -